# Study Circle Career Development Institute

# AMC
# Paper 2008

**B**

**Time : 1 Hrs.** **Marks : 200**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक

केंद्राची संकेताक्षरे

शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्याच विषयाचे प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आले आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## वॉर्ड ऑफिसर (३ ऑगस्ट २००८)

१) विकासात्मक प्रशासन ही ...... संकल्पना आहे.
(1) अल्पमुदतीची (2) दीर्घमुदतीची (3) मध्यममुदतीची (4) वरील कोणतीही नाही

---

२) स्थानिक संस्थांना राज्यसरकारने देऊ केलेल्या 'विशिष्ट–अनुदानाचे' उत्तम वर्णन म्हणजे :
(1) ते जाचक अहवाल देण्याशी जखडलेले आहे.
(2) ते स्थानिक संस्थांची दृष्टी जास्त लक्ष देण्याची गरज असलेल्या क्षेत्रावर वळवते.
(4) ते स्थानिक संस्थांचे कृती करण्याचे स्वातंत्र्य मर्यादित करते.
(4) वरील सर्व

---

३) व्यूहात्मक नेतृत्व ...... खालीलपैकी कोणते बरोबर आहे?
(1) हे संघटनेचे यशस्वी संस्थेमध्ये परिवर्तन करण्याची प्रक्रिया आहे.
(2) हे एकदिलाने काम करण्याची प्रेरणा देते व उत्तेजित करते.
(3) हे इतरांकडून इच्छित कृती करून घेण्याची क्षमता होय.
(4) वरील सर्व आहे.

---

४) कर्मचाऱ्यांना प्रेरणा देण्यासाठी ध्येये अतिशय परिणामकारक होतात जेव्हा ती ...... .
(1) स्वीकारण्यास योग्य असतात (2) आव्हानात्मक पण प्राप्त होण्याजोगी असतात
(3) निश्चित असतात (4) वरील सर्व असतात

---

५) मुंबईकर आजही पावसाळ्याच्या दिवसांत पुराच्या भीतीने घाबरतात कारण जोरदार, सतत धार पाऊस समुद्राच्या भरतीच्या वेळेस येणारा पाऊस. त्याची तीव्रता वाढवितो. यावर उपाय म्हणून खालील मार्ग सुचविण्यात आले आहेत. तुम्ही योग्य ते निवडा.
(1) सांडपाणी वाहून नेणारी गटारे, नाले यांची सफाई करणे.
(2) समुद्रपातळीच्या खाली ब्रिमस्टोवाड नावाची आधुनिक उपाय योजना (जागतिक पातळीवर वापरलेली)
(3) मल निःसारण प्रकल्प आणि पाणी साचणाऱ्या स्थानांवर ते साचणार नाही अशी व्यवस्था करणे
(4) मुंबईकरामध्ये जाणीव निर्माण करणे.

---

६) खालील विधाने काळजीपूर्वक वाचा जे बरोबर नाही त्याचाच उल्लेख करा.
(1) संघटनेच्या सहजसुलभ कारभारासाठी अधिकार व जबाबदाऱ्या यांनी हातमिळवणी करून किंवा हातात हात घालून जायला पाहिजे.
(2) अधिकार हे जबाबदाऱ्यांपासून काहीतरी वेगळे आहे. या दोघांमध्ये काडीमात्रचा संबंध नाही.
(3) अधिकार व जबाबदाऱ्या यांची सांगड घातली पाहिजे.
(4) अधिकार व जबाबदाऱ्या या परावलंबीत किंवा एकमेकांवर अवलंबून असतात, त्यांना स्वतंत्र अस्तित्व संघटनेच्या कामात असत नाही.

---

७) मुख्य प्रशासकीय अधिकारी हा ......

i) नगरपालिकेचा सर्व कार्यांचा अंमल करण्यासाठी दिग्दर्शन, मार्गदर्शन व नेतृत्व करतो.

ii) आराखडा बनवून व चौकट आखून धोरणे राबविण्यासाठी प्रारूप बनवून देतो.

iii) अंमलबजावणीसाठी विशाल ध्येये, उद्दीष्ट्ये व धोरणे निर्धारित करून देतो.

iv) योजनाबद्ध रीतीने कृतीचे नियमन करण्यासाठी ढोबळ नियम ठरवतो.

(1) (i) आणि (iv) बरोबर आहेत.
(2) सर्व बरोबर आहेत.
(3) (iii), (i) व (iv) बरोबर आहेत.
(4) (ii) व (iii) बरोबर आहेत.

---

८) कंपनीची कर्मचाऱ्यांची निवड पद्धत खालील घटकांवर अवलंबून असते.

(1) निवड पद्धतीचे स्वरूप ती कशी होती? सदोष की सुरक्षित?

(2) आस्थापनेचा दृष्टिकोन व कंपनीचे धोरण.

(4) उमेदवाराच्या प्रोबेशन कालावधीची लांबी.

(4) वरील सर्व घटक बरोबर आहेत.

---

९) नवीन प्रकल्प रचना सुकर होण्यासाठी एकात्मपद्धत ही ...... म्हणून ओळखली जाते.

(1) उद्योग विकास केंद्र
(2) व्यवसाय विकास केंद्र
(3) प्रकल्प विकास केंद्र
(4) वरील कोणतेही नाही

---

१०) खालील घटक हे कर्मचाऱ्यास त्याच्या कामात रस (गोडी) निर्माण करण्यास प्रवृत्त करतात. यापैकी कुठला घटक प्रवृत्त करण्यास कारणीभूत ठरत नाही?

(1) संपादन
(2) संपादनास मान्यता
(3) आव्हानात्मक काम
(4) कामाच्या ठिकाणी असलेल्या सोयी-सुविधा

---

११) गलिच्छवस्तीवर केलेल्या अभ्यासातून सातत्याने लक्षात आलेली समस्या म्हणजे –

(1) दारू पिण्याचे व्यसन (2) गरिबी (3) पायाभूत सुविधांची उणीव (4) निरक्षरता

---

१२) महानगरपालिका ही ...... यासाठी जबाबदार आहे.

i) मार्ग व उडान पुलांची निर्मिती व देखभाल
ii) स्वच्छता आणि आरोग्याची देखभाल
iii) इमारतींचा दर्जा ठरविणे व अमलात आणणे
iv) सागरकिनाऱ्याची सुरक्षितता

(1) (i) आणि (ii) बरोबर आहेत.
(2) फक्त (iv) बरोबर आहे.
(3) (ii), (iii) व (i) बरोबर आहेत.
(4) सर्व बरोबर आहेत

---

१३) प्रकल्प योजनेच्या प्रक्रियेत पहिले लक्ष ...... वर असावे.

(1) योजना आखण्याची साधने आणि तंत्रे
(3) प्रकल्पातील उपक्रम
(3) प्रकल्पातील फलित किंवा त्याची निष्पत्ती
(4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

१४) अर्थसंकल्प प्रस्थापित करणे, वास्तविक कार्यपालनाची नोंद करणे, प्रत्यक्ष व अंदाजित निकालांची तुलना करणे, फरकांची कारणमीमांसा करणे, सुधारकृती व उजळणी करणे या ...... प्रक्रियेतील पायऱ्या आहेत.

(1) खर्च नियंत्रण व फरक विश्लेषण
(2) अर्थसंकल्पीय नियंत्रण
(3) वित्तनियंत्रण
(4) वरील कोणतेही नाही

---

१५) ''जो मनुष्य दीर्घकालीन नियोजन व विचाराने वागत नाही, त्याला वर्तमानच त्रासदायक होतो.'' म्हणून नियोजन म्हणजेच ...... आहे.

(1) आगाऊ ठरविणे
(2) आगाऊ भाकीत करणे
(3) आगाऊ नियंत्रण करणे
(4) आगाऊ समन्वयन करणे

---

१६) कर्मचाऱ्याला शिस्त लावताना ताकीद ही ...... असावी.

(1) सोपी आणि समस्यात्मक वर्तणूक बदलण्याबाबतच्या अपेक्षा सांगणारी
(2) कर्मचाऱ्याच्या सेवा पुस्तिकेमध्ये लेखी नोंद असणारी
(3) कर्मचाऱ्याच्या पर्यवेक्षकाने आणि दुसऱ्या एका पर्यवेक्षकाने पाहिलेली
(4) अधिकृत प्रत मनुष्यबळ व्यवस्थापकाला दिलेली

---

१७) बदली धोरण ...... साठी राबविले जावे.
खालीलपैकी कोणते जास्त बरोबर आहे?

(1) कर्मचाऱ्यांना सतावण्यासाठी
(2) कर्मचाऱ्यांना न सतावण्यासाठी
(3) संघटनेच्या तसेच कर्मचाऱ्यांच्या हितासाठी
(4) वरील कोणतेही नाही.

---

१८) संकल्पनात्मक/एकात्मिक कौशल्यांच्या विस्तृत प्रशिक्षणाचा रोख ...... यावर असतो.

(1) उच्च श्रेणीचे व्यवस्थापक
(2) मध्यम श्रेणीचे व्यवस्थापक
(3) पहिल्या फळीचे व्यवस्थापक
(4) कामगार आणि तत्सम कर्मचारी

---

१९) खालीलपैकी कोणते विधान 'प्रत्यायोजना'बद्दल (delegation) **खरे नाही?**

(1) त्यामुळे वरिष्ठांचा वेळ कनिष्ठसुद्धा करू शकतील अशा कामापासून वाचतो.
(2) वरिष्ठांना आपली सत्ता घटेल असे भय वाटते.
(3) त्याचा अर्थ जबाबदारी आणि स्पष्टीकरण (accountability) सोडून देणे.
(4) त्यामुळे कनिष्ठांच्या नवीन क्षमतेचा विकास होतो.

---

२०) अधिकारप्रदान हे ...... साठी प्रशिक्षणाचा पाया म्हणून कार्य करते.

(1) व्यवस्थापन अधिकारा
(2) व्यवस्थापन संबंधा
(3) व्यवस्थापन विकासा
(4) व्यवस्थापन नियंत्रण

---

२१) महानगरपालिकेच्या दैनंदिन कारभारावर प्रशासकीय नियंत्रण (अंकुश) ठेवणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास ...... संबोधले जाते.
(१) महापौर (2) आयुक्त (3) नगर सेवक (4) मुख्य दंडाधिकारी

---

२२) खालीलपैकी कोणते विधान खरे आहे?
(1) सर्व नेते व्यवस्थापक असतात.
(2) परिणामकारक नेतृत्व करणे व्यवस्थापकांना अधिकृत हक्कांमुळे शक्य होते.
(3) सर्व व्यवस्थापक नेते असतात.
(4) अनधिकृत नेतृत्व अधिकृत प्रभावाइतकेच किंवा अधिक महत्त्वाचे असते.

---

२३) व्यवस्थापन नियंत्रण ठेवण्याच्या प्रक्रियेत खालील गोष्टींचा समावेश असतो फक्त ***<u>अपवाद</u>*** म्हणजे :
(1) दोषनिवारक कृती करणे (2) योजनाबद्ध कृती आखणे
(3) केलेल्या कामाची मानकांशी तुलना करणे (4) केलेल्या कार्याचे मोजमाप करणे

---

२४) माणुसकी–संबंध दृष्टिकोनाने अगोदरच्या व्यवस्थापन प्रणालीतल्या 'आर्थिक मानवा'पेक्षा ...... जोर दिला आहे.
(1) अति मानवावर (2) समाज मानवावर (3) कार्य मानवावर (4) वरील कोणतेही नाही

---

२५) विकासात्मक प्रकल्पांमध्ये सामाजिक फायदेक्षमता विश्लेषण तंत्र हे ...... तपासणीसाठी प्राणभूत महत्त्वाचे आहे.
(1) प्रकल्पाची क्रियात्मक कार्यक्षमता आणि त्याचे सामाजिक फायदे
(2) प्रकल्पाचे क्रियात्मक फायदे आणि त्याची सामाजिक कार्यक्षमता
(3) प्रकल्पांचा क्रियात्मक उणेपणा आणि उत्पादकतेत सुधारणा
(4) वरील कोणतेही नाही.

---

*२६) बी.एम.सी.चा कायदा ...... साली अस्तित्वात आला.*
*(1) १९४८ (2) १९५८ (3) १९६८ (4) १९०८*

---

२७) काही राज्यांनी पारंपरिक, सफाई वगैरे कामे नगरपालिकेकडून काढून घेतली आहेत कारण :
(1) सेवेच्या वाढत्या मागणीस तोंड देण्याची नगरपालिकांची असमर्थता
(2) निधी उभा करण्याबाबत नगरपालिका प्राधिकाऱ्यांची असमर्थता
(3) सफाई, पाणीपुरवठा इ.साठी राज्याची भांडवली खर्चात गुंतवणूक
(4) वरीलपैकी सर्व

---

२८) प्रशिक्षण हे केवळ ज्ञान देण्यासाठी व कौशल्यवाढीसाठी नव्हे तर संघटनेप्रति व कामाप्रति विधायक दृष्टिकोन विकसित व्हावा यासाठीही आहे. म्हणून तिथे ...... बाबतीत योग्य धोरणांची आवश्यकता आहे.

i) प्रशिक्षण पद्धती
ii) कार्यकारी शिकवणी
iii) प्रशिक्षण काळ
iv) प्रशिक्षणासाठी निधीची वाटणी

(1) (i) व (iii)
(2) (i), (iii) आणि (iv)
(3) फक्त (ii)
(3) वरील कोणतेही नाही

---

२९) महानगरपालिकेच्या अंदाजपत्रक तयार करण्याच्या प्रक्रियेत कोणाचा समावेश होतो?

(1) फक्त महापालिका आयुक्त
(2) महानगरपालिकेतील विभाग प्रमुख किंवा समिती प्रमुख
(3) महानगरपालिकेतील खालच्या पातळीवर काम करणारे अधिकारी
(4) वरील नमूद केलेले सर्वजण

---

३०) सरकारी विभागातील संगणकीकरणाबद्दल कोणते विधान ***<u>बरोबर नाही.</u>***

(1) टोकापासून टोकापर्यंत सेवा पोहोचविणाऱ्या यंत्रणेमुळे सेवेचा वेग आणि निश्चितता सुधारते.
(2) खंडशः संगणकीकरणामुळे सेवेचा इच्छित हेतू साध्य होतो.
(3) कागदावर आधारीत नोंद यंत्रणेला ते पर्याय देते.
(4) माहितीच्या साठवणीचा आणि पोहोचवण्याचा खर्च आणि वेळ वाचतो.

---

३१) शून्याधारित अंदाजपत्रकाबद्दल कोणतेही विधान ***<u>खरे नाही</u>?***

(1) पारंपरिक अंदाजपत्रकाची प्रक्रिया ते उलट दिशेने नेते.
(2) मागील खर्चाची पातळी विचारार्थ घेते.
(3) प्रत्येक विभागाच्या कामकाजाचा आढावा घेते.
(4) संपूर्ण अंदाजपत्रकातील वाढ किंवा घट याबद्दल ते तटस्थ असते.

---

३२) लेखापरीक्षेबाबत कोणते विधान ***<u>खरे नाही</u>?***

(1) आर्थिक यंत्रणेचे मूल्यांकन करते.
(2) विवरणपत्र चुकांपासून मुक्त असल्याची पूर्ण खात्री देते.
(3) ते संख्याशास्त्रातील नमुना चाचणीचा वापर करते.
(4) ते माहितीच्या भरवशाबद्दल खात्री देते.

---

३३) मनुष्यबळ नियोजनाची प्रत्येक संघटनेस गरज भासते कारण :
खालील दिलेल्या कारणांपैकी कुठले कारण सत्य नाही हे ओळखा.

(1) संघटनेस कार्य पूर्ततेसाठी
(2) मोठ्या प्रमाणावर नोकरांची अदलाबदल करण्यासाठी
(3) वारंवार नोकरी सोडून जाणाऱ्या कामगारांची सवय टाळण्यासाठी
(4) एक औपचारिकता पूर्ण करण्यासाठी

---

*३४) कंत्राटी कर्मचारी ठेवण्यात महत्त्वाचा फायदा म्हणजे :*
*(1) कामगिरी न केल्यास त्यांना कामावरून काढणे सोपे असते.*
*(2) कंत्राटी कर्मचारी त्यांना भरती केलेल्या क्षेत्रात तज्ञ असतात.*
*(3) कंत्राटी कर्मचाऱ्यांना मूळ वेतनाशिवाय इतर कोणतेही फायदे संस्था देत नाही.*
*(4) वरीलपैकी कोणतेही नाही*

---

३५) महानगरपालिकेचा अर्थसंकल्प कोण सादर करतो?
(1) मनपा महापौर (2) मनपा हिशेबनीस (3) मनपा आयुक्त (4) मनपा तपासनीस

---

३६) नेत्याची एक महत्त्वाची भूमिका म्हणजे जास्त चांगल्या कार्यपालनासाठी लोकांना प्रेरणा देणे होय. म्हणून नेतृत्व हे ...... च असले पाहिजे.
(1) व्यूहाच्या अंमलबजावणीसाठी लोकांना प्रेरणा देणारी गतिशील शक्ती
(2) धोरणाच्या अंमलबजावणीसाठी लोकांचे नेतृत्व करणारी सामाजिक शक्ती
(3) धोरणाच्या अंमलबजावणीसाठी लोकांना समाजप्रिय बनविणारे व्युव्हात्मक शक्ती
(4) वरील कोणतेही नाही

---

३७) १८६५ मध्ये सुरू झालेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेचे पहिले आयुक्त कोण होते?
(1) फिरोजशहा मेहता (2) ऑर्थर क्रॉफर्ड (3) दादाभाई नवरोजी (4) वरील कोणतेही नाही

---

३८) कोणत्या प्रकारची लेखापरीक्षा संस्थेच्या योजना, संघटन, नियंत्रण या प्रक्रियांचे वेळोवेळी मूल्यमापन करते.
(1) अर्थसंकल्पीय लेखापरीक्षा (2) बहिर्गत लेखापरीक्षा
(3) अंतर्गत लेखापरीक्षा (4) व्यवस्थापकीय लेखापरीक्षा

---

३९) खालील दिलेले अंदाजपत्रकाचे प्रकार आहेत त्यापैकी असा प्रकार निवडा की जो अंदाज पत्रक तयार करण्यासाठी व त्याची कार्यवाही करण्यासाठी सर्वानुमते मंजूर आहे किंवा स्वीकारलेला आहे.
(1) विधिमंडळाकडून तयार झालेले अदांजपत्रक
(2) अधिकारी वर्गाने तयार केलेले अंदाजपत्रक
(3) प्रशासकीय अधिकारी वा विधिमंडळातील अधिकारी यांनी तयार केलेले अंदाजपत्रक
(4) वरीलपैकी कुठलेही नाही

---

४०) प्रकल्प परीक्षणाच्या मुख्य पायऱ्या या ...... अशा आहेत.
(1) आर्थिक, तांत्रिक, संघटनात्मक, व्यवस्थापकीय, कार्यकारी व आर्थिक
(2) विपणन, कार्यकारी, मनुष्यबळ, वित्तीय व व्यवस्थापकीय
(3) प्राधान्य निहाय, प्रक्रिया निहाय, सुलभता निहाय, समर्थता निहाय व संभाव्यता निहाय
(4) वरील कोणतेही नाही

---

४१) ''प्रकल्प मूल्यन हे शास्त्र तसेच कलाही आहे.'' त्याच्या मूलभूत तत्त्वांवर थोड्या काळात प्रभुत्व मिळू शकते, पण या मूल्यन कलेचे यशस्वी आचरण करण्यासाठी ...... ची आवश्यकता असते.
(1) सूक्ष्म निरीक्षण व परिप्रेक्ष्य दृष्टी
(2) माहितीपूर्णता व चतुर सुज्ञपणा
(3) वस्तुनिष्ठता व निर्णय–क्षमता
(4) वरील सर्व

---

४२) नियंत्रण कार्यामध्ये 'पर्ट' (पी.ई.आर.टी.) हे ...... ...... ॲन्ड रिव्ह्यु टेक्नीक आहे.
(1) परफॉर्मन्स इव्ह्याल्युएशन
(2) परफॉर्मन्स इफीशिएन्सी
(3) प्रोग्रॅम इव्ह्याल्युएशन
(4) वरील कोणतेही नाही

---

४३) भारतीय उद्योगधंद्यात शिस्तीचे यथायोग्य पालन होण्याकरिता खाली चार (४) मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत. त्यापैकी कुठले चुकीचे आहे ते ओळखा.
(1) योग्य नोटिशीशिवाय संप वा टाळेबंदी न करणे.
(2) नेमून दिलेल्या कामापेक्षा कमी काम न देणे किंवा कामातील गती कमी न करता उत्पन्न देणे.
(3) हेतुपुरस्कर व जबरदस्तीने कंपनीच्या मालमत्तेचे नुकसान न करणे.
(4) हिंसाचार व दबाबयंत्राचा वापर करणे.

---

४४) खालीलपैकी कोणते आपत्तीकालीन व्यवस्थापनात संस्थाविषयक हितसंबधीय आहेत?
(1) पोलीस आणि मदतनीस सैन्य
(2) वृत्तपत्रे आणि दूरचित्रवाणी
(3) बिनसरकारी संस्था
(4) वरील सर्व

---

४५) ७४ व्या घटना दुरुस्ती विधेयकात नगरपालिकेच्या आर्थिक आयोगाची भूमिका ...... ही आहे.
(1) नगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे आणि त्याप्रमाणे राज्यपालांना शिफारशी करणे.
(2) राज्य आणि नगरपालिकेकडून कराद्वारे आलेल्या उत्पन्नाची विभागणी करण्यास आधारभूत तत्त्वे तयार करणे.
(3) राज्याच्या संचित निधीतून नगरपालिकांना मदत–अनुदान देणे.
(4) वरील सर्व

---

४६) PERT च्या आकृतिबंधात ज्या घटना आणि कार्यक्रम पूर्ण करण्यास जास्तीत जास्त वेळ लागतो त्याला ...... म्हणतात.
(1) आकृतिबंध
(2) व्यवस्थापक टाळतात तो मार्ग
(3) महत्त्वाची वाट
(4) प्रकल्प कृतीतून हटवल्यास प्रकल्पाला फार वेळ लागत नाही

---

४७) भविष्यात सुसभ्य संगणीकृत सभोवताल हा ...... यांच्यामधील संबंधावर जास्त परिणाम करील.
(1) व्यवस्थापन व विभाग
(2) प्रशासन व व्यवस्थापन
(3) संघटन व व्यवस्थापन
(4) संघटना व त्यांचा सभोवताल

---

४८) निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतील पहिला टप्पा म्हणजे ...... .
(1) पर्यायी उपाय निर्माण करणे.
(2) पर्यायी उपायातून निवड करणे.
(3) समस्या आहे आणि तिचे निराकरण करणे आवश्यक आहे हे मान्य करणे.
(4) पर्यायी उपायांचे मूल्यमापन करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे.

---

४९) संकेतमान्य (क्रमशः वाढणारे) अंदाजपत्रकाबद्दल कोणतेही विधान ***खरे नाही.***
(1) ते स्थिर आणि क्रमशः बदलते.
(2) भिन्न घटकातील अंदाजपत्रकांचे सुसूत्रीकरण करणे सोपे असते.
(3) अंदाजपत्रकाच्या कमालमर्यादेपर्यंत खर्च करण्यापासून ते परावृत्त करणे.
(4) ही पद्धत समजण्यास आणि वापरात आणण्यास सोपी आहे.

---

५०) शिस्तविषयक न्यायाधिकरण हे सदस्यावर कोणती अनुशास्ति लादू शकते, ज्याच्या विरुद्ध गैरवर्तणुकीचा दोषारोप कायम केला आहे.
(1) निष्कासन (2) निलंबन (3) दंड व खरडपट्टी (4) वरील सर्व

---

५१) संगणकाचे मुख्य कार्यघटक खालील आहेत, फक्त ***अपवाद*** म्हणजे :
(1) निविष्टी (input) (2) प्रक्रिया
(3) अनुभवावर अधिष्ठित शिकण्याची पद्धत (4) उत्पादन (output)

---

५२) कार्य मूल्यमापनांच्या संदर्भात खालील विधाने वाचा व जे विधान चुकीचे आहे. त्याची निवड करा.
कार्य मूल्यमापन खालील गोष्टींसाठी उपयोगी असते :
(1) बक्षीसी किंवा शाबासकी देण्याकरिता.
(2) जेथे विकास कामासाठी प्रयत्न करणे जरुरीचे आहे असे क्षेत्र ओळखण्याकरिता.
(3) निवड व विकास कामांच्या वैधतेसाठी एक साधन म्हणून वापर करण्याकरिता.
(4) नको असलेल्या कामगाराविरुद्ध बदला घेण्यासाठीचे एक साधन म्हणून वापरण्याकरिता.

---

५३) अंतर्गत पदोन्नती धोरण खालील गोष्टी करते, फक्त ***अपवाद*** म्हणजे :
(1) व्यक्ती-व्यक्तीमधल्या संघर्षाला उद्युक्त करते (2) संस्थेतील कर्मचाऱ्यांना संधी देते
(3) नवीन कल्पनांचा अभाव आणते (4) संस्थेला ताजा दृष्टिकोन देते

---

५४) जेव्हा कामाच्या परिस्थितीत लवचिकता हवी असते तेव्हा काही वेळा ...... हे परिणामकारक उत्तर होऊ शकत नाही.
(1) प्रमाणीकरणाने सुसूत्रता (2) योजनेद्वारे सुसूत्रता
(3) एकमेकात समायोजन करून सुसूत्रता (4) विकेंद्रीकरणाने सुसूत्रता

---

५५) महाराष्ट्र राज्यात महानगरपालिकांची एकूण संख्या २००७ सालापर्यंत ...... होती.
(1) २० (2) २१ (3) २२ (4) २३

---

५६) जेव्हा नियोजन संख्यात्मक माध्यमांतून व्यक्त करतात तेव्हा ते ...... म्हणून ओळखले जाते.
(1) धोरण (2) पद्धती (3) कार्यक्रम (4) अर्थसंकल्प

---

५७) अंदाजपत्रक ...... हे सूचना व समर्पक माहिती देणारा लिखित संच असून त्याचा उपयोग अंदाजपत्रक कार्यक्रम अंमलबजावणीसाठीची नियम पुस्तिका व संदर्भ म्हणून होतो.
(1) पुस्तिका (2) पुस्तक (3) उद्दिष्ट्ये (4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

५८) सांघिक गटात महत्त्वाचा परंतु कार्यगटात न आढळणारा महत्त्वाचा पैलू म्हणजे :
(1) ऊर्जा (2) उत्साह (3) सहक्रिया (4) ध्येय

---

५९) खालीलपैकी कर्मचाऱ्यांविषयी कोणत्या घटनेत अधिकाराचा वापर आढळतो ?
(1) राजीनामा देण्याकरिता मन वळवले.
(2) वरिष्ठांनी कामावरून काढण्यासाठी मार्गदर्शन केले.
(3) संघटनेने दबावाने कामावरून काढण्याचा आदेश मागे घ्यायला लावले.
(4) योग्य नोटीस देऊन कामावरून काढून टाकले.

---

६०) खालीलपैकी कोणते विधान ***बरोबर नाही ?***
i) निर्णय प्रक्रिया ही धोरण मांडणी प्रक्रियेतील निवड आहे.
ii) निर्णय प्रक्रिया व धोरण मांडणी सारखेच आहे.
iii) धोरण मांडणी निर्णय प्रक्रियेस मार्गदर्शन करते.
iv) धोरण मांडणी ही निर्णय बनविण्यापेक्षा सामान्यीकरणाची संकल्पना आहे.
(1) (i) + (ii) फक्त (2) (ii) + (iii) फक्त
(3) (ii) फक्त (4) (iii) फक्त

---

६१) हुकूम देण्याचा हक्क व आज्ञाधारकत्वाची नेमकी शक्ती हे ...... सार आहे.
(1) अधिकाराचे (2) जबाबदारीचे (3) स्पष्टीकरण योग्यतेचे (4) वरिष्ठत्वाचे

---

६२) प्रकल्प म्हणजे :
(1) कार्य करण्याची योजना (2) मननाधिष्ठित कल्पना
(3) हाती घ्यावयाचा प्रस्ताव (4) वरील सर्व

---

६३) योजना अपयशी होण्याचे मुख्य कारण म्हणजे :
(1) योजना करताना पुरेशी माहिती वापरली असते.
(2) एकदा योजना केल्यावर ती फार प्रयत्न न करता फलद्रूप होईल अशी व्यवस्थापनाची अपेक्षा असते.
(3) व्यवस्थापन योजनेप्रमाणे काम करते.
(4) योजना आखण्याची जबाबदारी ही योजना विभागाच्या बाहेरील लोकांवर सोपवली असते.

---

६४) अरिष्ट व्यवस्थापन हा :
i) अरिष्ट टाळण्याचा पद्धतशीर प्रयत्न आहे.
ii) घडणाऱ्या अरिष्टाला व्यवस्थित तोंड देण्याचा प्रयत्न आहे.
iii) नुकसानीची भिती दाखविणाऱ्या आकस्मिक घटनांनाही तोंड देण्याचा प्रयत्न आहे.
(1) फक्त (ii) बरोबर आहे (2) फक्त (iii) बरोबर आहे
(3) फक्त (i) बरोबर आहे (4) सर्व बरोबर आहे

---

६५) कामगिरीचे मूल्यन करण्याच्या पद्धतीत खालील गोष्टी उपयुक्त ठरू शकतात, फक्त ***अपवाद*** म्हणजे .......
(1) नेहमी वैध बाबींचा विचार करावा.
(2) कामगिरीचे मानक कार्यविश्लेषणावर आधारित असावे.
(3) शक्य असेल तेव्हा एकाहून अधिकजण मूल्यमापन करणारे असावेत.
(4) आवाहन करण्यासाठी अनौपचारिक प्रक्रिया विकसित करावी.

---

६६) वरिष्ठ–कनिष्ठ संबंध हे, ज्या संघटनेत, वैयक्तिक आवड, नावड, दृष्टिकोन व पूर्वग्रहांवर आधारित असतात, तिला ...... म्हणतात.
(1) औपचारिक संघटन (2) अनौपचारिक संघटन
(3) एकात्म संघटन ना (4) ना संघटन

---

६७) माहितीचे मूल्य ठरवताना खालील सर्व घटक महत्त्वाचे असतात, फक्त ***अपवाद*** म्हणजे :
(1) उचितपणा (2) खर्च (3) गुणवत्ता (4) समयोचितपणा

---

६८) शून्याधारित अर्थसंकल्पात ...... समाविष्ट असते.
(1) निर्णय पुडक्यांची मांडणी (2) निर्णय पुडक्यांना दर्जा देणे
(3) निवडलेल्या पुडक्यांना संसाधनाचे वाटप करणे (4) वरील सर्व

---

६९) प्रकल्प नियोजन ''समाविशक व समन्वयित क्रियाशीलता'' सूचित करते, ती महामंडळाचे सर्वपैलू दर्शविते व ...... उद्देशीत करते.
(1) विकासाच्या त्वरणाकडे (2) बदलांसाठी नियोजन अशा जीवनमार्गाकडे
(3) दृष्टान्त कल्पनांना वास्तवात उतरविण्याकडे (4) वरील सर्वांकडे

---

७०) मुंबई झोपडपट्टी आरोग्य कार्यक्रम २००२ हा जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने यशस्वी होत आहे. त्याचे रहस्य ...... मध्ये आहे.
(1) सी.बी.ओ. व एन.जी.ओं.च्या भूमिका
(2) बी.एम.सी.द्वारे रात्रंदिवस स्वच्छता व देखभाल
(3) महानगरपालिकेच्या धोरणांची परिणामकारक अंमलबजावणी
(4) वरील कोणतेही नाही

---

७१) नेता हा ......
(1) अनुयायांवर टिका करतो
(2) अनुयायांच्या वाढीला उत्तेजन देतो
(3) अनुयायांसाठी ध्येये व उद्दीष्ट्ये पुढे ठेवतो
(4) अनुयायांना हुकूम देतो व दिग्दर्शन करतो.

---

७२) इलेक्ट्रॉनिक संचार तंत्रज्ञानाचा फायदा म्हणजे :
(1) नोकरशाहीतील शिष्टाचार मोडता येतात.
(2) इ–मेल (e-mail) संदेशावर संनियंत्रण ठेवता येते.
(3) संज्ञापन करणाऱ्याच्या विचार प्रक्रियेबद्दल सूक्ष्म आणि शब्द विहित सुगावा मिळण्याची क्षमता असते.
(4) नेहमीचे संदेश मोठ्या संख्येच्या कर्मचाऱ्यांना वेगाने आणि कार्यक्षमतेने पाठवणे.

---

७३) मुलाखत ही भरतीची पद्धत म्हणून ...... .
(1) वस्तुनिष्ठ आहे.
(2) अतिशय विश्वसनीय आहे.
(3) चांगली आहे कारण लोकांना मानवी वर्तणुकीची चांगली जाण असते.
(4) लोकप्रिय आहे, परंतु बहुतांशी तिची योग्य अंमलबजावणी होत नाही.

---

७४) अतिरेकी श्रमविभागणीचा परिणाम म्हणजे :
(1) कामाची प्रेरणा
(2) कंटाळवाणे काम
(3) विशेषीकरण नसलेले काम
(4) कामातील घटलेले कौशल्य

---

७५) "PERT/CPM" चे खालील फायदे असतात, फक्त ***अपवाद*** म्हणजे :
(1) ते प्रकल्पातील महत्त्वाच्या कार्यावर लक्ष देते.
(2) ते खर्च आणि वेळापत्रकावरील अतिक्रमणाची शक्यता कमी करते.
(3) ते तंत्रज्ञानाच्या कामगिरीत सुधारणा करते.
(4) ते वेळापत्रक बनविण्याच्या मार्गात लवचिकता आणते.

---

७६) अनधिकृत विकास करणाऱ्यासाठी किमान किती दंडाची रक्कम विहित केली आहे?
(1) रु. ५००
(2) रु. १०००
(3) रु. १५००
(4) रु. २०००

---

७७) मंजूर विकास योजनेतील सार्वजनिक प्रयोजनार्थ आरक्षित असलेल्या जागेचे भूसंपादन ...... या कायद्यातील तरतुदीनुसार करण्यात येते.
(1) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६
(2) भूसंपादन अधिनियम १८९४
(3) महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरे अधिनियम १९६५
(4) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ आणि भूसंपादन अधिनियम १८९४

---

७८) प्रारूप विकास योजना प्रसिद्धीनंतर शासनास मंजुरीसाठी सादर करण्याचा किती मूळ कालावधी विहित केला आहे?
(1) एक वर्ष (2) दोन वर्ष (3) तीन वर्ष (4) चार वर्ष

---

७९) समजा तुम्हाला बांद्रा येथील बगीचासाठी असलेल्या आरक्षणामधून हस्तांतरणीय विकास हक्क मिळालेले आहेत. हे हस्तांतरणीय विकास हक्क तुम्हांला कुठे वापरता येतील?
(1) कुलाबा (2) माटुंगा (3) परेल (4) बोरीवली

---

८०) खालीलपैकी कोणती जोडी योग्य जुळत ***नाही*** ?
(1) मुंबई – नवी मुंबई (2) मुंबई – पुणे
(3) पुणे – पिंपरी चिंचवड (4) औरंगाबाद – नवीन औरंगाबाद

---

८१) सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ...... टक्के नागरी लोकसंख्या आहे.
(1) ३२ (2) ३५ (3) ४२ (4) ४५

---

८२) २० व्या शतकामध्ये मुंबई शहर कोणत्या उद्योगधंद्यासाठी प्रसिद्ध होते?
(1) ऑटोमोबाईल (2) टेक्सटाईल (3) ॲग्रो (4) फार्मास्युटिकल्स

---

८३) भारतातून निर्यातीस चालना मिळण्यासाठी भारत सरकारने नजीकच्या काळात उचललेले वैधानिक पाऊल कोणते?
(1) महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम अमलात आणला.
(2) नागरी औद्योगिक विकास प्राधिकरणांची स्थापना केली.
(3) विशेष आर्थिक विभाग कायदा अमलात आणला.
(4) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना विविध ठिकाणी केली.

---

८४) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कोणत्या कलमाखाली प्रारूप विकास योजना प्रसिद्ध केली जाते?
(1) २५ (2) २६ (3) २७ (4) २८

---

८५) खालीलपैकी जमीन विकास व व्यवस्थापनाच्या कोणत्या प्रकारच्या पद्धतीमध्ये ''अश्रूंविना भूसंपादन'' शक्य आहे?
(1) नगर रचना योजना तयार करणे
(2) विकास योजना तयार करणे
(3) रहिवास वापरासाठी रेखांकन तयार करणे
(4) प्रादेशिक योजना तयार करणे

---

८६) नगर परिषद क्षेत्र स्थापन करण्याकरिता किमान ...... लोकसंख्या आवश्यक आहे.
(1) १५,००० (2) २०,००० (3) २५,००० (4) ३०,०००

---

८७) महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कार्ये) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अधिनियम अमलात आला.
(1) १९९५ (2) १९९८ (3) १९९९ (4) २०००

---

८८) म्हाडा अधिनियमानुसार मासिक सरासरी उत्पन्नाच्या किती पट रक्कम जमिनीच्या भूसंपादनासाठी विहित केली आहे?
(1) ५० (2) १०० (3) १५० (4) २००

---

८९) शिवशाही पुनर्वसन प्रकल्पांतर्गत झोपडपट्टी पुनर्बांधणी व पुनर्वसन योजनेद्वारे झोपडपट्टीधारकांना घरे बांधून देण्याची योजना तयार करण्यासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या अभ्यासगटाचे अध्यक्ष कोण होते?
(1) श्री. दिनेश अफझलपूरकर
(2) श्री. के. नलिनाक्षन
(3) श्री. सुखटणकर
(4) श्री. चार्लस कोरीया

---

९०) खालीलपैकी कोणत्या राज्यांमधून दिल्ली–मुंबई औद्योगिक मार्ग प्रस्तावित आहे.
(1) महाराष्ट्र आणि राजस्थान
(2) महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश
(3) महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश
(4) महाराष्ट्र आणि कर्नाटक

---

९१) भारताच्या संपूर्ण क्षेत्रामध्ये मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य भारतीय संविधानातील कोणत्या अनुच्छेदामध्ये दिले आहे?
(1) अनुच्छेद क्र. १४
(2) अनुच्छेद क्र. १९
(3) अनुच्छेद क्र. २१
(4) अनुच्छेद क्र. ३०

---

९२) 'लग्न' निरर्थक ठरविण्याचे कारणे हिंदूविवाह कायदा, १९५६ च्या खालील कलमांत स्पष्ट केली आहेत.
(1) कलम (१५) (2) कलम (१४) (3) कलम (११) (4) कलम (१२)

---

९३) ध्वनिप्रदूषणासंबंधी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या फोरम, प्रोटेक्शन ऑफ एनव्हायर्नमेंट अँड साऊंड पोल्यूशन वि. भारत सरकार (२००५) या निर्णयामध्ये ध्वनिवर्धक वापरण्यासंबंधी जी मर्यादा आहे ती अशी :
(1) कोणताही ध्वनिवर्धक पोलिसांच्या परवानगीशिवाय वापरावयाचा नाही
(2) कोणताही ध्वनिवर्धक आजूबाजूच्या रहिवाशांच्या परवानगीशिवाय वापरावयाचा नाही
(3) रात्री १० ते सकाळी ६ या वेळात पोलिसांच्या परवानगीने ध्वनिवर्धक वापरता येईल
(4) कोणताही ध्वनिवर्धक रात्री १० ते सकाळी ६ या वेळात वापरावयाचा नाही

---

९४) मुस्लीम कायद्यानुसार, अज्ञान मुलांच्या संपत्तीचा रक्षणकर्ता नाही,
(1) वडील (2) वडिलांचे वडील (3) आई (4) वडिलांच्या मृत्युपत्राचा व्यवस्थापक

---

९५) एक अविवाहित स्त्री तिच्या मित्राच्या मुलीला दत्तक घेऊ इच्छिते. असे दत्तक घेणे विधीग्राह्य असेल, जरः
(1) ती स्त्री, तिचा मित्र व मुलगी हिंदू असतील
(2) तो मित्र हिंदू नाही, परंतु ती स्त्री व ती मुलगी हिंदू असतील
(3) तो मित्र आणि त्याची मुलगी पारशी असतील आणि ती स्त्री ख्रिश्चन असेल
(4) ती स्त्री हिंदू असेल आणि तिचा मित्र व ती मुलगी ख्रिश्चन असतील

---

९६) गुन्हेगारी न्याय पद्धतीमध्ये गुन्हेगाराला शिक्षा देण्यामागे कोणता हेतू असतो?
(1) भिती घालणे (2) प्रतिबंध करणे
(3) सुधारणा घडवून आणणे (4) वरील तिन्हीचे एकत्रीकरण

---

९७) खालीलपैकी कोणती मालमत्ता 'रेस–इनकॉरपोरेलीस'च्या व्याखेत येणार नाही?
(1) घर (2) गहाण ठेवलेले घर
(3) गहाण सोडवून घेण्याचा हक्क (4) गहाण मुक्त घर

---

९८) भारतीय संविधानाच्या १४ व्या अनुच्छेदाप्रमाणे 'कायद्यासमोर सर्वसमान व सर्वांना कायद्याचे समान संरक्षण' खालीलपैकी कोणाला देण्यात आले आहे?
(1) भारतात राहणाऱ्या सर्व व्यक्तींना (2) भारतात राहणाऱ्या सर्व भारतीय नागरिकांना
(3) भारतात अधिवास असणाऱ्या, सर्व व्यक्तींना (4) सर्व नैसर्गिक व्यक्ती व कायद्याची मान्यता प्राप्त व्यक्तींना

---

९९) 'घटस्फोट कायदा, १८६९' नुसार घटस्फोटासाठी कोण अर्ज करू शकतो?
(1) पारसी (2) हिंदू (3) मुस्लीम (4) वरीलपैकी कोणीही नाही

---

१००) सरकारी सेवा आणि सरकारी अनुदान घेणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये अपंग व्यक्तींसाठी किती आरक्षण आहे?
(1) ३% पेक्षा अधिक नाही (2) ३% पेक्षा कमी नाही
(3) ५% पेक्षा अधिक नाही (4) ५% पेक्षा कमी नाही

---

□□□

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

Study Circle

**Answers**

१) विकासात्मक प्रशासन ही ...... संकल्पना आहे.
(1) अल्पमुदतीची (2) दीर्घमुदतीची (3) मध्यममुदतीची (4) वरील कोणतीही नाही

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १–२ | २–२ | ३–४ | ४–४ | ५–२ | ६–२ | ७–२ | ८–२ | ९–३ | १०–४ |
| ११–३ | १२–३ | १३–३ | १४–२ | १५–१ | १६–१ | १७–३ | १८–१ | १९–३ | २०–x |
| २१–२ | २२–२ | २३–२ | २४–२ | २५–१ | २६–x | २७–४ | २८–२ | २९–४ | ३०–२ |
| ३१–२ | ३२–२ | ३३–४ | ३४–x | ३५–३ | ३६–२ | ३७–२ | ३८–४ | ३९–१ | ४०–१ |
| ४१–४ | ४२–३ | ४३–४ | ४४–४ | ४५–४ | ४६–३ | ४७–४ | ४८–३ | ४९–३ | ५०–४ |
| ५१–३ | ५२–४ | ५३–४ | ५४–१ | ५५–३ | ५६–४ | ५७–१ | ५८–३ | ५९–४ | ६०–३ |
| ६१–१ | ६२–४ | ६३–२ | ६४–४ | ६५–४ | ६६–२ | ६७–२ | ६८–४ | ६९–४ | ७०–१ |
| ७१–३ | ७२–४ | ७३–३ | ७४–२ | ७५–३ | ७६–४ | ७७–४ | ७८–१ | ७९–४ | ८०–२ |
| ८१–३ | ८२–२ | ८३–३ | ८४–२ | ८५–१ | ८६–३ | ८७–३ | ८८–२ | ८९–१ | ९०–१ |
| ९१–२ | ९२–३ | ९३–४ | ९४–३ | ९५–१ | ९६–४ | ९७–३ | ९८–४ | ९९–४ | १००–२ |

study CIRCLE